श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-१० | ऑक्टोबर-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२ |

## डेरवण येथे ‘व्हायरॉलॉजी रिसर्च अ‍ॅन्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी’चे उद्‌घाटन

*“या लॅबचा येथील डॉक्टर्स आणि पेशंटना उपयोग तर होईलच. पण येथील वैद्यकीय विद्यार्थ्यांना त्याचा सर्वाधिक उपयोग होईल. जडणघडणीच्या काळात त्यांना मॉलिक्युलर बायॉलॉजीचा परिचय होतो आहे, त्यामुळे त्यांचा वैद्यकशास्त्राकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलेल!”*

*– डॉ. श्रीपाद बाणावली*

डेरवण येथे भ.क.ल.वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ‘व्हायरॉलॉजी रिसर्च अ‍ॅन्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी’चे दि. १८ सप्टेंबर २०२० रोजी डॉ. श्रीपाद बाणावली, डायरेक्टर (अ‍ॅकॅडेमिक्स), टाटा मेमोरिअल सेंटर (मुंबई) यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

हॉस्पिटलच्या सेंट्रल क्लिनिकल लॅबोरेटरी बिल्डिंगमध्ये १००० चौ. फुटाच्या प्रशस्त जागेत अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने बांधलेल्या आणि अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त अत्याधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्ज अशा या प्रयोगशाळेत वेगवेगळ्या आर.एन.ए. आणि डी.एन.ए. विषाणूंचे निदान आणि संशोधन होणार आहे.

डॉ. वासुदेव भिडे, एम.डी. (रेडिऑलॉजी), सिॲटल, यु.एस.ए., यांनी आपले वडील डॉ. नारायण कृष्णाजी भिडे, प्रोफेसर ऑफ फार्माकॉलॉजी, ‘A.I.I.M.S’, नवी दिल्ली आणि मातोश्री डॉ. विमल नारायण भिडे, डिपार्टमेंट ऑफ क्लिनिकल पॅथॉलॉजी, ‘A.I.I.M.S’, नवी दिल्ली यांच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून या प्रयोगशाळेची उभारणी करण्यात आलेली आहे.




*व्हायरॉलॉजी लॅबचे उद्‌घाटन करताना डॉ. बाणावली, सोबत (डावीकडून) – श्री. लक्ष्मीकान्त महाजन, श्री. अशोकराव जोशी, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील*



*डॉ. नकाते डॉ. बाणावली आणि श्री. विकासराव यांना लॅबची माहिती देताना*

सकाळी ठीक १० वाजता प्रयोगशाळेचे उद्घाटन झाल्यावर डॉ. बाणावली, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, विश्वस्त श्री. अशोक रघुनाथ जोशी, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी यांनी संपूर्ण प्रयोगशाळेची पाहाणी केली. या प्रयोगशाळेच्या उभारणीत मोलाची कामगिरी करणारे प्रो. प्रसन्न नकाते यांनी प्रयोगशाळेविषयी संपूर्ण माहिती सन्माननीय पाहुण्यांना दिल्यावर संस्थेच्या सभागृहात आयोजित उद्घाटन समारंभाला सुरुवात झाली.

समारंभाची सुरुवात श्रीसहजानंदसरस्वती महाराजांच्या प्रतिमेसमोर दीप प्रज्वलनाने झाली. डॉ. निवेदिता केतकर यांनी प्रार्थनागायन केल्यावर प्रमुख पाहुणे डॉ. बाणावली यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

त्यानंतर संस्थेच्या मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील यांनी स्वागतपर भाषण केले. आपल्या भाषणात 'नदी ज्याप्रमाणे स्वत:चं पाणी स्वत:च पीत नाही, वृक्ष स्वत:ची फळे स्वत: खात नाहीत, ढग स्वत:चे अन्न पिकविण्यासाठी पाऊस पाडत नाहीत, त्याप्रमाणे सज्जनांचे ऐश्वर्य हे त्यांच्या उपभोगासाठी नव्हे तर लोकांसाठीच असते' अशा अर्थाचे सुभाषित उद्धृत करून त्या म्हणाल्या की हे सुभाषित सार्थ करण्यासाठीच जणू श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टची स्थापना १९६८ साली झाली आहे. जो आयुष्यभर परोपकारासाठी जगतो त्याच्याच जीवनाचे सार्थक होते. १९९६ साली हे रुग्णालय, मग शाळा, मग मेडिकल कॉलेज स्थापन झाले आणि कोकणवासियांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून नि:स्वार्थीपणे कार्य करणारी संस्था आणि वालावलकर कुटुंबीयांची कष्ट करून आर्थिक पाठबळ देण्याची तयारी यामुळे हा आविष्कार येथे पाहायला मिळतो. हे सत्यात उतरविण्यासाठी, आरोग्यसेवा रुग्णांना थेट त्यांच्या दारात उपलब्ध करून देण्यासाठी म्हणून येथे कॅन्सर रुग्णांवर उपचार करताना काहीही कमी पडू दिले जात नाही. किमोथेरपी, कॅन्सर सर्जरी, रेडिएशन थेरपीची सर्व सोय येथे करण्यात आली. हृद्रोगाचे वाढते प्रमाण पाहता हृदयरोगावरचे सर्व उपचार, एम.आर.आय., ब्लडबॅन्क, काम्पोनन्ट लॅब, हिस्टोपॅथॉलॉजी, सुसज्ज पॅथॉलॉजी, मायक्रो-बायॉलॉजी अशा सोयी येथे या कोकण विभागात प्रथमच उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे गेल्या २४ वर्षात लाखो लोकांचे प्राण या रुग्णालयामुळे वाचले. अनेक नवजात अर्भकांना आणि मातांना जीवदान मिळाले. या पार्श्वभूमीवर विषाणूनिर्मित रोगांचे निदान लवकर व्हावे आणि रुग्णांना संरक्षण आणि दिलासा



*पाहुण्यांसमवेत लॅबमधील कर्मचारी*




डॉ. बाणावली दीपप्रज्वलन करताना




श्री. विकासराव वालावलकर यांचे हस्ते डॉ. बाणावली यांचा सत्कार

मिळावा यासाठी ही 'व्हायरॉलॉजी रिसर्च आणि डायग्नोस्टिक लॅब' सुरू करण्यात येत आहे. यासाठी इंडियन मेडिकल काउन्सिल ॲन्ड रिसर्च आणि एन.ए.बी.एल. यांचे सर्व नियम तंतोतंत पाळून ही लॅब उभी केलेली आहे. येथील सुसज्ज यंत्रणेमुळे केवळ कोविडच नव्हे तर डेंग्यू, हिपॅटेटीस-ए,बी,सी,डी, सार्स, 'एच.आय.व्ही.', मलेरिया, ह्युमन पॅपिलोमा व्हायरस, सर्व्हायकल कॅन्सर निर्माण करणारा व्हायरस अशा सर्व विषाणूंवरचे उपचार ताबडतोब करण्यात येणार आहेत. मेडिकल कॉलेजच्या मायक्रोबायॉलॉजी डिपार्टमेन्टचे डॉ.नकाते यांच्या मार्गदर्शनाखाली या लॅबचा आराखडा तयार करण्यात आला. इंजिनीअर लक्ष्मीकान्त महाजन, इलेक्ट्रिशिअन श्री. किरण पेटकर आणि इंजिनीअर पाटील यांनी अविरत मेहनत करून अल्पावधीत ही लॅब उभी केली. त्यामुळे आता व्हायरल आजारांवर उपचार करणे सहज शक्य होणार आहे. डोळ्याने न दिसू शकणारे जंतू जेव्हा त्रास देऊ लागतात तेव्हा बुद्धीचा वापर करून संशोधनानेच त्यावर मात करावी लागते. या लॅबमधील यंत्रणा अशा संशोधनाला पूरक आहे. संशोधनाचे एक नवीन दालनच आज उघडले गेले आहे. यात पुढे जीनो टायपिंग, क्लोनिंग, म्युटेशन, आनुवंशिक रोगांचे निदान, डी.एन.ए. या सर्व विषयांवर संशोधन होईल. संस्थेच्या सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटीच्या सदस्य आणि ज्येष्ठ संशोधक डॉ. रीटा मुल्हेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली असे संशोधन सुरूही करण्यात आले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली डॉ. देव यांनी डोनेट केल्याप्रमाणे डी.एन.ए. आणि आर.एन ए. एक्स्ट्रॅक्शन प्रोसिजरचे ट्रेनिंग मिळण्यासाठी अशाच प्रकारची लॅब कॉलेजच्या मायक्रोबायॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये प्रस्तुत करण्यात आली आहे. त्या लॅबमध्ये वर्कशॉप्स घेऊन डॉक्टर्सना सतत ट्रेनिंग देण्यात येत आहे. या लॅबचा संशोधनासाठी आणि रुग्णांच्या उपचारासाठी पुरेपूर उपयोग व्हावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना!''

यानंतर बोलताना संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी डॉ. बाणावली यांच्या हस्ते लॅबचे उद्घाटन होत असल्याबद्दल विशेष आनंद व्यक्त केला आणि आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून ते आल्याबद्दल त्यांचे आभार मानले. 'रुग्णालयाच्या २५ वर्षाच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीत ही लॅब सुरू होणे हा आणखी एक मैलाचा दगड आहे, आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. ६० बेड्ससह सुरू झालेल्या या रुग्णालयाने गत २५ वर्षांमध्ये बराच मोठा पल्ला गाठला आहे. मला कल्पना आहे की संस्थेच्या वाटचालीत २५ वर्षे म्हणजे मोठा कालावधी नाही. असं म्हणतात की एक वर्षासाठी काही करायचे असेल तर भाताची पेरणी करा. दहा वर्षांसाठी झाडे लावा, पण समाजासाठी शंभर वर्षाची तरतूद करायची असेल तर संस्था स्थापन करा. श्री सहजानंदसरस्वती महाराजांनी याच विचारातून 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' आणि 'श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट'ची स्थापना केली.

सुसंस्कारित आणि सुखी माणूसच शरीर आणि मनाने कणखर असतो. अशा माणसांचा समाजच देशाला सामर्थ्यवान करतो. आपल्या विशाल देशात बलशाली समाज घडविण्याचे सरकारचे प्रयत्न अपुरे पडतात. भौतिक सुखांमागे धावणाऱ्या समाजाला त्याच्या कर्तव्यांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्यासाठी नि:स्वार्थी, सेवाभावी संस्थांची आवश्यकता असते. याच विचारातून श्री सहजानंदमहाराजांनी एक साधा कार्यक्रम हाती घेतला. समाजातील गोरगरिबांच्या अन्न, वस्त्र, निवारा तसेच स्वच्छ पेयजल, आरोग्य आणि शिक्षण आदी मूलभूत गरजा भागविणे; अज्ञान, आळस आणि अंधश्रद्धा यांच्या पाशांमधून त्यांची सुटका करणे, त्यांच्यामध्ये आपल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारश्याबद्दलचा अभिमान जागृत करणे; देश, देव आणि धर्म याबद्दलच्या आपल्या




*डॉ. सुवर्णा पाटील आपले विचार व्यक्त करताना*




*श्री. विकासराव वालावलकर ट्रस्टच्या कार्याविषयी बोलताना*

जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांविषयी त्यांना सजग करणे आणि हे साध्य करण्यासाठी भौतिक आणि बौद्धिक पातळ्यांवर अनेक कार्यक्रम त्यांनी सुरू केले. बदलत्या कालमानाला आणि गरजांना अनुसरून नवनवे कार्यक्रमही हाती घेण्यात आले. गत पन्नास वर्षात महाराजांनी केलेल्या कार्याची आपणाला कल्पना आहेच. त्याची मी पुनरावृत्ती करीत नाही. पण गेल्या वर्षा दीड वर्षात लो. टिळक आणि स्वा. सावरकर यांची स्मारके उभारण्यात आली. त्याचा उद्देश आजच्या पिढीला मागील पिढीतील देशभक्तांच्या त्यागाची कल्पना यावी. स्वा. सावरकरांनीच म्हटले आहे की जे देश इतिहास विसरतात त्यांचा भविष्यकाळ कधीच उज्ज्वल नसतो.

गतवर्षी डिसेंबरमध्ये जर्मनीतून येऊन डॉ. ख्रिस्तोफर लॅन्ग यांनी येथे एक युरोसर्जरीचे शिबिर घेतले. ते आणि त्यांचे चार सहकारी स्वखर्चाने येथे आले. २ कोटी रुपयांची मशिनरी त्यांनी येताना येथे आणली होती. हे भारतात बहुधा प्रथमच घडले असावे. जर्मन्स तसे चोखंदळ आणि चिकित्सक असतात. डेरवणला काहीतरी चांगली कामे होत आहेत याची खात्री पटल्याशिवाय ते येथे आले नसते. शिक्षणक्षेत्राबद्दल बोलायचे तर गत वर्षी ४० विद्यार्थ्यांसह फिजिओथेरपीचे कॉलेज सुरू झाले. या वर्षी मेडिकल पोस्ट ग्रॅज्युएटची पहिली बॅच सुरू झाली. मॅनेजमेंट, फॅकल्टी आणि स्टाफ यांच्या दीर्घ प्रयत्नांना मिळालेले हे यश आहे.

आता या व्हायरॉलॉजी लॅबच्या उद्घाटनाने एक पाऊल पुढे पडले आहे. पुढील प्रवास हा दीर्घ आहे. पण श्रीसहजानंदमहाराजांच्या आशीर्वादाने आणि श्रीकाकामहाराजांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही उत्साहाने आणि आत्मविश्वासाने नवे टप्पे गाठीत आणि नवी शिखरे सर करीत मार्गक्रमण करीतच राहू.''

यानंतर प्रो. नकाते यांनी आपल्या भाषणात प्रयोगशाळेविषयी विस्ताराने माहिती देऊन सर्वांना ही प्रयोगशाळा पाहण्याचे आवाहन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'आमच्या मायक्रोबायॉलॉजी डिपार्टमेंटसाठी हा फार अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. लोक सारखे विचारीत होते की आपल्याकडे लॅब कधी सुरू होणार? आता दहा दिवसातच टेस्टिंग सुरू होईल. आता सगळीकडे कोविडची चर्चा आहे म्हणून लोकांना वाटते आहे की ही लॅब कोविडसाठी आहे. पण तसे काही नाही. सर्व प्रकारचे व्हायरस, काही दुर्मिळ प्रकारचे बॅक्टेरिया, त्याचप्रमाणे मेटॅबोलिक डिसऑर्डर, कॅन्सर्स, जेनेटिक डिसॉर्डर या सगळ्यांचे निदान येथे होऊ शकते; एवढा त्याचा स्कोप आहे. अर्थात सुरुवात कोविडपासून झाली तरी जशी गरज पडेल तसे पुढे जाणार आहोत. आता आपल्याकडे पोस्ट ग्रॅज्युएशन सुरू झालेले आहेत. या लॅबचा उपयोग करून आपण त्यांनाही केसेस देऊ शकतो. सध्या आपण कोविडसाठी 'ॲन्टिजेन टेस्ट' करणार आहोत पण त्याची सेन्सिटिव्हिटी आणि स्पेसिफिसिटी कमी असते. त्यामुळे बऱ्याच वेळा रिझल्ट निगेटिव्ह येतो. पण 'rtPCR' टेस्ट जास्त अचूक असते त्यामुळे येथे 'rtPCR' टेस्टवरती आम्ही जास्त भर देणार आहोत.

या लॅबची रचना अशी केलेली आहे की येथे काम करणाऱ्यांना कमीत कमी रिस्क असेल. आपण सगळ्याच प्रिकॉशन्स घेतल्या तर येथे अजिबात रिस्क नाही. येथे वेगवेगळे सेक्शन्स केलेले आहेत. सॅम्पल घेऊन येणाऱ्यांसाठी सॅम्पल रिसिव्हिंग सेक्शन आहे. आपल्याकडे सहा बायोसेफ्टी कॅबिनेट्स आहेत. त्यात हे सॅम्पल्स आणि 'फॉर्म्स' चेक केले जातील. या कॅबिनेटममधून हवा बाहेर येऊ शकत नाही. त्यामुळे टेस्ट करणाऱ्याला रिस्क नाही. वेगवेगळ्या प्रोसेससाठी वेगवेगळ्या रूम्स आहेत आणि प्रत्येकात सेपरेट डेडिकेटेड बायोसेफ्टी कॅबिनेट्स आणि डेडिकेटेड टेक्निशिअन्स असणार आहेत. एक टेक्निशिअन एका रूममधून दुसऱ्या रूममध्ये जाणार नाही. त्यामुळे क्रॉस ट्रान्समिशन होणार नाही. दहा दिवसात आता टेस्टिंग सुरू होईल. महाजनसाहेब, पेटकर आणि शिवकुमार यांनी मेहनतपूर्वक आम्हाला हवे तसे काम

करून दिले. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. अशी सुसज्ज लॅब उभारून दिल्याबद्दल संस्थेचेही आभार.''

शेवटी डॉ. बाणावली यांनी आपले विचार व्यक्त केले. ते आपल्या मुख्य भाषणात म्हणाले, ''अशी जागतिक दर्जाची सुंदर लॅब उभारल्याबद्दल मी प्रथम संपूर्ण 'बी.के.एल.वालावलकर टिम'चे अभिनंदन करतो. मी ही अतिशयोक्ती करत नाही. आमच्या टाटा हॉस्पिटलमध्येही आमची लॅब आहे. अन्य अनेक परदेशी लॅब्स मी पाहिल्यात. त्यांच्या तुलनेत कोठेही उणेपण नसलेली किंबहुना प्रो. नकाते यांनी म्हटल्याप्रमाणे अधिक चांगली अशी ही लॅब उभी केली आहे. कारण यामध्ये पुढील पाच-दहा वर्षात कराव्या लागणाऱ्या विस्ताराचाही विचार केलेला आहे. अनेक वेळेला लॅब सुरू केल्यावर वर्षभरातच जागा कमी पडू लागते. पण येथे पुढील विस्ताराला पुरेल एवढी जागा आहे आणि आत्तापेक्षा ही लॅब खूप मोठी होऊ शकेल. महाजन, पाटील यांच्या टिमने विक्रमी वेळात ही लॅब तयार केली, हेही उल्लेखनीय आहे. नाहीतर सरकारी संस्थांमध्ये काही ठिकाणी अशा लॅब उभारायला वर्षे लागली आहेत.''

डॉ. सुवर्णा आणि श्री. विकासराव यांनी हॉस्पिटलचा उल्लेख केला त्या जागतिक दर्जाच्या हॉस्पिटलच्या उभारणीच्या कल्पनेशी माझे आईवडील आणि सद्गुरू यांच्या कृपेने मी पहिल्यापासून जोडलेला आहे. आपणापैकी अनेकांना माहीत नसेल ही या रुग्णालयाची सुरुवात एका लहानश्या बैठ्या इमारतीत झाली. अगदी प्राथमिक स्वरूपाची आरोग्यसेवा देण्यास सुरुवात झाली कारण त्या वेळी कोकणात सीटी स्कॅन, रक्त तपासणी अशा अगदी प्राथमिक रोगनिदान सेवासुद्धा उपलब्ध नव्हत्या. अजून अनेक शहरात किंवा आजूबाजूच्या भागात अतिदक्षता विभागाची सोय नाही किंवा डायलिसिस किंवा अन्य प्राणरक्षक उपकरणे उपलब्ध केलेली नाहीत.म्हणून अगदी प्राथमिक सेवांपासून सुरुवात करून आज आपण पाहात आहोत त्या स्वरूपात रुग्णालयाची हळूहळू




*डॉ नकाते लॅबच्या उभारणीविषयी माहिती देताना*




*डॉ. बाणावली यांचे अध्यक्षीय भाषण*

उभारणी झाली आहे. आज येथे ट्रॉमा केअर, कॅन्सर केअर, इन्ट्राव्हेन्शनल रेडिऑलॉजी अशा अनेक सेवा सुरू झाल्या आहेत. सगळ्यांची नावे घेत बसलो तर दिवस पुरणार नाही. पण यातील बहुतेक सेवा या भागात या रुग्णालयात प्रथम सुरू झाल्या. मग मेडिकल कॉलेज सुरू झाले, आता या वर्षी पोस्ट ग्रॅज्युएशन सुरू झाले आहे. कार्डिॲक कॅथ लॅब, कार्डिॲक सर्जरी आता सुरू झाली आहे. म्हणजे एका पाठोपाठ एक नवीन सेवा येथे सुरू होत आहेत आणि त्यामुळे रुग्णशुश्रूषेचा स्तर अतिशय उच्च दर्जाचा झाला आहे. आणि आज ही 'व्हायरॉलॉजी लॅब' सुरू होत आहे. हे सर्व श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराज यांची दूरदृष्टी आणि श्रीकाकामहाराज यांचे मार्गदर्शन यामुळेच होत आहे.

खरे तर अगदी पहिल्या दिवसापासून 'बोनमॅरो ट्रान्स्प्लान्ट युनिट' किंवा 'कार्डिॲक कॅथ लॅब' सुरू करता आली असती. पण अगदी मूलभूत गोष्टींपासून सुरुवात करून आज ही संस्था शिखरावर पोहोचली आहे. आणि याच पद्धतीने संस्था, श्री. विकासराव म्हणाले त्याप्रमाणे, १०० वर्षे टिकू शकते, प्रगती करू शकते. सुरुवात शिखरावरून केली तर संस्था लगेचच उतरणीला लागते आणि कोलमडून पडते. तेव्हा संस्था चालविण्याचा हाच मार्ग योग्य आहे, आणि येथे वर्षानुवर्षे त्याच पद्धतीने काम सुरू आहे. श्रीमहाराजांना येथे कोकणातील लोकांसाठी जागतिक दर्जाची आरोग्यसेवा द्यायची होती आणि ते सर्वात महत्त्वाचे आहे.

मला आठवते की मी सायन हॉस्पिटलला असताना पाहायचो की अगदी छोट्या गोष्टींसाठी येथील लोकांना मुंबईला यावे लागायचे. आजही निर्बंध असल्यामुळे लोक शहरात उपचारासाठी जाऊ शकत नाहीत. अगदी विरार, भाइंदरसारख्या दूरच्या ठिकाणांहून लोक मोफत उपचार मिळणाऱ्या रुग्णालयात जाऊ शकत नाहीत. तेव्हा श्रीमहाराजांनी अगदी योग्य वेळी हे रुग्णालय सुरू करण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे या भागातील लोकांना आता शहरात जावे लागत






*प्रशस्त लॅब*

नाही. बहुतेक सर्व उपचार येथे होतात आणि नवीन नवीन सोयी येथे केल्या जात आहेत. येथे मेडिकल कॉलेजही आहे आणि ते उत्तमरीत्या सुरू आहे. निम्म्याअधिक कॉलेजीसमध्ये एम.आर. आय. मशीन असते पण ते सुरू नसते कारण त्याची देखभाल व्यवस्थितरीत्या केलेली नसते. येथे प्रत्येक गोष्ट व्यवस्थितरीत्या सुरू असते. येथील वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी ही भाग्याची गोष्ट आहे की त्यांच्या शिक्षणाच्या पायाभरणीच्या काळात त्यांना या सर्व गोष्टींची व्यवस्थित ओळख होत आहे.

प्रत्येक काळ्या ढगाला रुपेरी कडा असते असे म्हणतात. करोनाच्या संकटातही अनेक चांगल्या गोष्टी होत आहेत. आम्हाला आमच्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टींचे महत्त्व समजून येत आहे. आपण हात जोडून 'नमस्ते' करतो, पादत्राणे घराबाहेर ठेवतो, हात-पाय स्वच्छ धुऊन घरात प्रवेश करतो, रोगप्रतिकारक शक्ती वाढेल असे सकस अन्न खातो. हे सगळे संस्कार म्हणजे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीच आहेत. 'करोना'मुळे आपल्या संस्कृतीचे महत्त्व आपणाला समजले आहे. आपल्याकडेच नव्हे तर जगभरच करोनामुळे अनेक चांगल्या गोष्टी घडत आहेत. जगभर 'इन्फ्रास्ट्रक्चर'मध्ये सुधारणा केल्या जात आहेत. अधिक आय.सी.यू.ची सोय, अधिक व्हेंटिलेटर्स, अधिक 'हाय-फ्लो ऑक्सिजन'ची सोय सर्वच रुग्णालयात केली जात आहे. म्हणजे सर्वत्र 'इन्फ्रास्ट्रक्चर'मध्ये सुधारणा होत आहेत आणि त्याचा फायदा वैद्यकीय विद्यार्थ्यांना होत आहे. ही काळ्या ढगाची रुपेरी कडा आहे.

करोनामुळे ही लॅब सुरू करण्याच्या कामाला गती आली हे खरे आहे, पण या लॅबचा फायदा केवळ डॉक्टर्स आणि पेशंट यांनाच न होता, मेडिकल स्टुडंट्सनाही या 'मॉलिक्युलर व्हायरॉलॉजी लॅब'ची




*ऑटो क्लेव्ह*



*बायोसेफ्टी कॅबिनेट*



*मिनिस्पिन सेन्ट्रिफ्युज*

उत्तम ओळख होईल. आजकाल 'मेडिसिन'मध्ये खूप झपाट्याने बदल होत आहेत. लोक निदान आणि उपचाराकडे अधिकाधिक जोर देत आहेत. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणात 'मॉलिक्युलर बायॉलॉजी'ला अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. आपल्या कॉलेजमध्ये या शिक्षणाची सोय आहे ही उत्तम गोष्ट आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना 'मॉलिक्युलर' तंत्रज्ञानाचा चांगला परिचय होईल. आणि ही तर केवळ सुरुवात आहे. ही लॅब हळूहळू अधिक विकसित होईल.

मी नेहमी सांगतो की वैद्यकशास्त्र (medicine) हे चार खांबांवर उभे असते. पहिला खांब म्हणजे प्रतिबंध (prevention). जरी यावर फार भर दिला जात नाही तरी मला असे वाटते की प्रतिबंध हाच खरा वैद्यकशास्त्राचा पाया आहे. काय आणि कसे टाळायचे यावर भर दिला तर आपण आपल्या आरोग्याची काळजी घेऊ शकतो. लवकर निदान होणे ही दुसरी आणि अचूक निदान ही तिसरी महत्त्वाची गोष्ट आहे. योग्य उपचार ही शेवटची महत्त्वाची गोष्ट. मॉलिक्युलर लॅब या चारही गोष्टी साध्य करायला मदत करते. आताचे युग हे अगदी अचूक वैद्यकीय निदानाचे आहे. आपण केवळ 'न्युमोनिया' असे निदान न करता, तो 'व्हायरल' आहे, की




*प्रत्येक प्रोसेसला स्वतंत्र जागा*

'बॅक्टेरिअल' आहे की 'फंगल' आहे हे ठरवतो त्यामुळे पेशंटला नेमके उपचार देता येतात.

प्रतिबंधाविषयी विचार करताना, आता 'मॉलिक्युलर बायॉलॉजी'मुळे अनेक रोगांचा etiopathogenesis समजतो. मी कर्करोगाच्या क्षेत्रातील आहे त्यामुळे तेथीलच उदाहरण देतो. स्तनाचा कर्करोग हा आज देशातील स्त्रियांमध्ये सर्वाधिक होणारा कर्करोग आहे. पण आपण BRCA mutation करून त्याचे पूर्वानुमान काढू शकतो, आणि स्त्री–पुरुषांचे अनेक प्रकारचे कर्करोग टाळू शकतो. म्हणजे 'मॉलिक्युलर बायॉलॉजी' अनेक रोगांचा प्रतिबंध करण्याला मदत करू शकते. त्याचबरोबर निदान लवकर होणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

आत्तापर्यंत आपण व्हायचे ते नुकसान होऊन गेल्यावर निष्कर्षापर्यंत पोहोचत होतो. उदाहरण द्यायचे तर, न्युमोनियाचे निदान करताना छातीचा सीटी स्कॅन काढल्यावर ते विशिष्ट व्रण दिसतात, पण तेव्हा उशीर झालेला असतो. पण हे निदान लवकर झाले तर अनेक प्राण आपण वाचवू शकतो आणि उपचाराचा खर्चही कमी होतो. लवकर निदान म्हणजे लवकर उपचार आणि उपचाराचा खर्च बराच कमी. हे फक्त कॅन्सरच्याच नव्हे तर संसर्गजन्य रोगांबाबतही खरे आहे आणि त्यासाठी अशा लॅबचा खूप उपयोग आहे. कोणत्याही चांगल्या रुग्णालयात अशी लॅब असणे हे चांगलेच आहे. आता आपण खूप प्रगती केली आहे. आता पूर्वीसारखी व्रण अथवा गाठ वगैरेची तपासणी करण्याची गरज नाही. आता 'लिक्विड बायॉप्सी' म्हणजे रक्त किंवा लाळेचा नमुना घेऊन त्याची मॉलिक्युलर टेस्ट आपण येथे, या लॅबमध्ये करू शकतो.

आणि आता next generation sequencing rtPCR ची अपेक्षा आहे. त्या पुढील पाऊल असेल ते 'जेनोमिक्स'. Next generation sequencing मुळे आपण खूप लवकर निदान करू शकू. विशेषतः फंगल आणि व्हायरल रोगांच्या संक्रमणाचे




थर्मोमिक्सर




व्होर्टेक्स मिक्स्चर

निदान लवकर होईल. जर वेळेत निदान झाले तर परिस्थिती हाताबाहेर जाणे टाळता येते. आधुनिक उपचार बरेच महाग आहेत. जर नेमके निदान झाले तर नेमके उपचार करता येतात आणि त्याचा खर्चही बेताचा येतो. मॉलिक्युलर निदान पद्धतीने लहान मुलांमधील 'लिम्फोमा'मधील फरक लक्षात येतो. कारण त्यातील अनेक प्रकारच्या 'लिम्फोमां'चे 'ट्रान्सलोकेशन आणि 'म्युटेशन' हे विशिष्ट प्रकारचे असते. त्यामुळे त्याचे योग्य ते निदान होऊन उपचार करता येतात. हे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण कॅन्सर किंवा संसर्गजन्य रोगांमध्ये दुसरी संधी कधीही मिळत नाही.

आपण हळूहळू आपण या लॅबचे कार्यक्षेत्र केवळ 'व्हायरस'च नव्हे तर कॅन्सर आणि संसर्गजन्य रोगांपर्यंत वाढवू शकतो. त्यामुळे अधिक रुग्णांना आपण अधिक चांगली सेवा देऊ शकू. आजच्या अचूक औषधयोजनेच्या काळात, कॅन्सर तसेच संसर्गजन्य रोगातील सूक्ष्म भेद ओळखता आल्यामुळे नेमके उपचार देता येतील.

जोसेफ स्टॅलिनचे एक सुप्रसिद्ध वाक्य आहे, 'एका व्यक्तीचा मृत्यू हा नेहमीच दु:खकारक असतो. पण जेव्हा लक्षावधी लोक मरतात तेव्हा ती केवळ आकडेवारी ठरते!' आजच्या वैद्यकशास्त्रालाही तेच लागू आहे. एखादी ट्रीटमेंट मोठ्या संख्येने रुग्णांना लागू पडत असेल पण एखाद्या विशिष्ट रुग्णाला दिलेली विशिष्ट ट्रीटमेंट त्याला पूर्ण बरे करते म्हणून आपण प्रत्येक रुग्णाचा वेगळा विचार केला पाहिजे. नेमकी येथेच मॉलिक्युलर बायॉलॉजी आपल्याला उपयोगी पडते. जरी आपण तेथे पोहोचलो नसलो तरी त्या दृष्टीने आपली वाटचाल सुरू आहे. आणि मी पुन्हा सांगतो की मॉलिक्युलर निदान पद्धतीच आपणाला अचूक मदत करील आणि पेशंटला नेमके आणि अचूक उपचार मिळतील. उदाहरणार्थ, chordoma मध्ये, मॉलिक्युलर बायॉलॉजीने शोधलेली निरनिराळी 'म्युटेशन्स' नेमके उपचार ठरवायला मदत करतात, आणि साहजिकच पेशंटला त्याचा फायदा होतो. म्हणून मी म्हणतो की मॉलिक्युलर बायॉलॉजीला उज्ज्वल भवितव्य आहे.

माझ्या रेसिडेन्सीच्या काळात, माझे गाईड डॉ. अडवानी 'मॉलिक्युलर बायॉलॉजी'बद्दल बोलत असत.. We had only Philadelphia positive, so CML was the only disease where we knew that this is important and then came acute promyelocytic leukaemia. मी त्यावेळी म्हणत असे की सर, हे बदलणार नाही. आणि ते ठामपणे सांगत असत की हे बदलेल! मॉलिक्युलर बायॉलॉजीने खरंच आमची कामाची पद्धत बदलली आहे.

या लॅबचा येथील डॉक्टर्स आणि पेशंटना उपयोग तर होईलच. पण येथील वैद्यकीय विद्यार्थ्यांना त्याचा सर्वाधिक उपयोग होईल. जडणघडणीच्या काळात त्यांना मॉलिक्युलर बायॉलॉजीचा परिचय होतो आहे, त्यामुळे त्यांचा वैद्यकशास्त्राकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलेल. ही सुरुवातीची, "rtPCR" लॅब आहे. भविष्यात ते येथे next generation sequencing सारखे अधिक प्रगत तंत्रज्ञान पाहतील.

काही लोक म्हणतात की मॉलिक्युलर बायॉलॉजी म्हणजे 'चैनीची गोष्ट' आहे. मी तर उलट असे म्हणेन की ही गरजेची

गोष्ट आहे. विशेषत: प्रगतीच्या मार्गावर असलेल्या देशाला तर हे वरदानच आहे. आपण एक उदाहरण पाहू. तापाने आजारी पेशंट आला तर आपण ॲण्टिबायोटिक्सचा मोठा डोस देऊ, त्याचे हजारो रुपये बील होईल. त्याने गुण आला नाही तर 'ॲन्टिफंगल' औषधे देऊन पाहू. म्हणजे त्याचे आणखी हजार रुपये! मग 'व्हायरल'ची औषधे देऊ. कॅन्सरबाबत बोलायचे तर आम्ही केमोथेरपी देतो त्याने ट्रीटमेंटचा खर्च बराच वाढतो. पण त्या कॅन्सरचे नेमके स्वरूप जर ट्रीटमेंट सुरू करण्याआधीच समजले असेल तर ट्रीटमेंटचा खर्च खूपच कमी येईल आणि योग्य उपचारांमुळे पेशंटलाही बरे वाटेल. वालावलकर हॉस्पिटलच्या टीमचे पुन्हा एकदा अभिनंदन. या लॅबचा व्यापक उपयोग होईल, अधिक पेशंट रोगमुक्त होतील, डॉक्टर्सना पेशंट्सची चांगली काळजी घेता येईल आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांना अधिक ज्ञानसंपादनासाठी ही लॅब उपयुक्त ठरेल अशा शुभेच्छा मी व्यक्त करतो!'

सूत्रसंचालिका डॉ. फोरम शहा यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर समारंभ समाप्त झाला. या समारंभाचे नियोजन 'कोविड संक्रमणा'चा धोका लक्षात घेऊन सर्व काळजी घेऊन करण्यात आले होते.



## व्हायरॉलॉजी लॅबच्या उद्‌घाटनप्रसंगी आलेले काही संदेश –

**श्री. चंद्र पी. त्रिपाठी (सल्लागार, सी.एस.आर., बजाज ऑटो लि.) –**

''आपल्या नवीन, क्रान्तिकारी 'व्हायरॉलॉजी रिसर्च ॲन्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी'च्या दि. १८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उद्‌घाटन समारंभाच्या निमंत्रणाबद्दल आभार.

ही लॅबोरेट उभी करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या भ.क.ल.वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या संपूर्ण संघाचे मी हार्दिक अभिनंदन आणि कौतुक करतो. त्यांच्या समर्पित उत्साहामुळेच हा लॅबोरेटरीच्या उद्‌घाटनाचा आणखी एक मैलाचा दगड गाठणे शक्य झाले आहे.

मी याप्रसंगी अभिवादन आणि शुभेच्छा व्यक्त करतो आणि डॉ. नाडकर्णी यांच्याशी झालेल्या चर्चेप्रमाणे, या लॅबने संशोधनात, विषेशत: करोनावरील संशोधनात नवे आदर्श प्रस्थापित करावेत अशी तीव्र इच्छा व्यक्त करतो.

उद्‌घाटन समारंभासाठी माझ्या शुभेच्छा. मला व्यक्तिश: हजर राहता येणार नसले तरी मी मनाने आणि हृदयाने नेहमीच आपल्याबरोबर आहे.''

---

**श्री. अजय के. साठे ( सी.एस.आर., बजाज ऑटो लि.)**

प्रयोगशाळेचा प्रकल्प पूर्ण होत आहे हे समजल्यावर मला अतिशय आनंद झाला आहे. मी मूळचा कोकणातीलच असल्याने, तेथील लोकांसाठी हा प्रकल्प किती महत्त्वाचा आहे याची मला पूर्ण कल्पना आहे, आणि त्यामुळे तुम्हाला माझ्या भावना समजतील !

उद्‌घाटन समारंभाला येणे मला शक्य होणार नाही पण महिन्याभरानंतर या प्रकल्पाला माझ्या पत्नी आणि मुलीसह भेट देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

प्रकल्प पूर्ण झाल्याचे कळविल्याबद्दल आणि निमंत्रणाबद्दल आभारी आहे. कृपया श्री. विकासराव वालावलकर, डॉ. नेताजी यांना माझ्या शुभेच्छा आणि श्रीकाका महाराज यांना माझा नमस्कार कळविणे.

---

**डॉ. रिटा मुल्हेरकर –**

आपल्या निमंत्रणाबद्दल आभार.

भ.क.ल.वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या इतिहासात आजचा दिवस फार महत्वाचा आहे. आणखी एक मानाचा तुरा! अगदी अल्प काळात रुग्णालयाने CT, MRI, Cath lab  अशा अनेक अत्याधुनिक सोयी केल्या आहेत. आता लवकरच 'cGMP facility' सुरू झाल्यावर अगदी अलीकडची 'रिजनरेटिव्ह थेरपी' सुरू होईल. कोकण आणि आजूबाजूच्या भागातील लोकांना सुदैवी म्हटले पाहिजे कारण असे अत्याधुनिक केंद्र आणि असे समर्पित आणि निस्वार्थी लोक त्यांच्या भागात काम करीत आहेत.

'व्हायरॉलॉजी रिसर्च ॲन्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी' या 'कोविड १९'च्या सर्वव्यापी साथीच्या काळात तर अत्यंत उपयोगाची आहेच, पण कोकणातील विशिष्ट संसर्गांचे निदान होण्यासाठीही नेहमीच ती उपयुक्त ठरणार आहे. भारतात मुख्यत्वे श्वसनमार्ग संसर्ग, अतिसार संसर्ग, क्षयरोग, एड्स, मलेरिया ही महत्त्वाची मृत्यूची कारणे आहेत. मी बरीच वर्षे 'कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूट'(आताची ACTREC) मध्ये सर्व्हिकल कॅन्सरवर काम केले आहे त्यामुळे मी सांगू शकते की पाश्चात्य देशात या कॅन्सरचे प्रमाण कमी आहे. आणि त्याचे कारण तेथे होणाऱ्या तपासण्यांमुळे निदान लवकर होते आणि आता लसही उपलब्ध आहे.  भारत आणि अन्य प्रगतिशील देशात स्त्रियांमध्ये सर्व्हिकल कॅन्सर हाच आढळणारा मुख्य प्रकार आहे. 'ह्युमन पॅपिलोमा व्हायरस'साठी जर मोठ्या प्रमाणावर सामुदायिक तपासणी केली तर सर्व्हिकल कॅन्सरची रुग्णसंख्या नक्कीच कमी होईल. यासाठी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाच्या 'व्हायरॉलॉजी रिसर्च ॲन्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी'ने 'ह्युमन पॅपिलोमा व्हायरस'च्या तपासणीसाठी पुढाकार घेतला पाहिजे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांसाठी उत्तम निदान आणि उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून सातत्याने झटणाऱ्या 'व्हायरॉलॉजी रिसर्च ॲन्ड डायग्नोस्टिक लॅबोरेटरी' आणि भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांना माझ्या शुभेच्छा!

# 'बॉम्बे रनिंग' चा 'द स्पीड प्रोजेक्ट'

'द स्पीड प्रोजेक्ट' म्हणजेच आयोजकांनी निर्धारित केलेल्या वेळेत जास्तीत जास्त अंतर सांघिकरीत्या धावून पूर्ण करणे हे होय. अशा अपारंपरिक शर्यतींचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'द बॉम्बे रनिंग' हा धावपटूंचा गट सक्रीय असतो. एस.व्ही.जे.सी.टी. क्रीडा संकुलाच्या ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅकवर दि. ५ सप्टेंबर आणि ६ सप्टेंबर २०२० या कालावधीत झालेल्या या वेगळ्या प्रकारच्या शर्यतीमध्ये बॉम्बे रनिंग संघाच्या चार पुरुष आणि दोन महिला अशा सहा धावपटूंनी भाग घेतला होता. जागतीक स्तरावर खेळल्या गेलेल्या स्पर्धेसाठी तयार केलेल्या 'ॲप'द्वारे या सर्व स्पर्धेतील सहभागींच्या कामगिरीची तांत्रिक नोंद ठेवण्यात आली होती.

अमित लाहेकर, अनिल कोरवी, अमान मेहला, मनोज राणे, प्रियांका भट आणि पायल खन्ना या सहा धावपटूंनी एस.व्ही.जे.सी.टी. क्रीडा संकुलातील ट्रॅकवर ३१ तास १५ मिनिट या कालावधीमध्ये ५०२.४७ किलोमीटर अंतर पार केले आणि जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर स्थान मिळविले. सदर स्पर्धेमध्ये जगभरातील ३०० संघांनी वेगवेगळ्या ठिकाणांहून सहभाग घेतला होता. त्यामध्ये अमेरिकन संघाने प्रथम क्रमांक, फ्रान्स संघाने द्वितीय आणि भारताच्या'द बॉम्बे रनिंग' या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

विविध वयोगटाच्या धावपटूंचे संघटन करण्यासाठी 'बॉम्बे रनिंग' या समुदायाची स्थापना करण्यात आली. या गटाचे ६०० हून अधिक धावपटू मुंबईमधील विविध ठिकाणी आपला सराव करीत असतात आणि या प्रकारातील नवनवीन स्पर्धांमध्ये धावून आपले कौशल्य आजमावत असतात. बरेच स्पर्धक स्वत:च्या आनंदासाठी किंवा स्वतःचे ध्येय साध्य करण्यासाठी धावतात. टीएसपीसारख्या शर्यतींमध्ये सांघिक सहभाग हा आवश्यक असतो. परंतु लोकांना एकत्र आणणे, त्यांना संघ म्हणून प्रशिक्षित करणे आणि त्यानंतर स्पर्धेत सहभागी करणे यासाठी हा गट वर्षभर कार्यरत असतो.



या स्पर्धेचे मुख्य प्रशिक्षक 'नायके रन क्लब' इंडियाचे डॅनियल वाज हे होते. लॉकडाऊन दरम्यान खेळाडूंना प्रशिक्षित करणे कठीण होते, तरीसुद्धा प्रशिक्षक डॅनियल यांनी धावपटूंना खडतर प्रशिक्षण दिले. त्यामुळे खेळाडू अधिक गती वाढविण्यास आणि वेग टिकवून ठेवण्यासाठी सक्षम ठरले. या आधी झालेल्या सर्व स्पर्धा ह्या मुंबई ते गोवा अशा स्वरूपाच्या होत्या. पण यावेळी स्पर्धक क्रीडासंकुलातील ट्रॅकवर धावणार असल्यामुळे प्रत्येक खेळाडू ८०० मीटर धावून काही वेळ विश्रांती घेवू शकत होता. 'येथील ट्रॅकवर धावताना आम्ही स्वतःला भाग्यशाली आणि ऑलिम्पिक खेळाडू समजलो.' अशा भावना संपूर्ण संघाने व्यक्त केल्या.





**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com







**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. | Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०